लोकमत

# रसिक हाच कवितेचा खरा प्रियकर व समीक्षकही

## डॉ. अक्षयकुमार काळे : साहित्य अकादमी व वि. सा. संघाचा संयुक्त उपक्रम



वि. सा. संघाच्या कार्यक्रमात बोलताना अक्षयकुमार काळे व उपस्थित मान्यवर.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** केशवसुतांनी कवी व कवितेचे नाते प्रियकर-प्रेयसी असे म्हटले आहे. पण हे अर्धसत्य असून, रसिक हा कवितेचा खरा प्रियकर असतो. हाच रसिक पुढे जाऊन समीक्षक होतो, असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे यांनी व्यक्त केले.

साहित्य अकादमी मुंबई आणि विदर्भ साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'समीक्षकासोबत एक संध्याकाळ' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी वि. सा. संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, साहित्य अकादमीच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे प्रामुख्याने उपस्थित होते. डॉ. काळे यांनी, आयुष्यभर रसिक या नात्याने कवितेचा प्रियकर होण्याचा प्रयत्न केला व त्यात आनंद मिळाल्याची भावना व्यक्त केली. कवितेच्या खऱ्या आस्वादासाठी व्यक्तिमत्त्व मुक्ती, तादात्म्य, धीर अशा गुणांची आवश्यकता असते. या तीन गुणांची साधना केल्यामुळे काव्यानंदात राहता येते, असे ते म्हणाले. ज्यांना कविता कळत नाही, त्याने ती वाचणे सोडून द्यावे व अरसिकतेने त्यावर कोणतेही भाष्य करू नये असे सांगताना त्यांनी गालिब, ग्रेस यांच्यावर दुर्बोधतेची टीका झाली.

कवी आणि कविता वेगवेगळी असते. कविता स्वतंत्रपणे काहीतरी बोलत असते. लेखकाने साम्यवादी, आंबेडकरीवादी, जडवादी, ईश्वर, निरीश्वरवादी, आत्मवादी असता कामा नये.

अशा वादांचे सावट आपल्या समीक्षेवर त्याने पडू देऊ नये, असे आवाहनही त्यांनी केले. युगवाणीचे संपादक प्रफुल्ल शिलेदार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन वृषाली देशपांडे यांनी केले. विवेक अलोणी यांनी आभार मानले.